# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

**(नॅक समिती तर्फे "अ" दर्जा प्राप्त)**

## जाहीर प्रगटन

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद च्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संलग्नीत असलेल्या महाविद्यालयामध्ये आणि मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विषय, विद्याशाखा, व अतिरिक्त तुकडीवाढ साठी अर्ज दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९ पर्यंत ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठातर्फे जाहिर आवाहन करण्यात येत आहे.

उपरोक्त नमुद केलेले अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यासाठी विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर Homepage वरील Affiliation Portal या Link वर Click करुन Proposal Guidelines २०२०-२१ येथे Click करुन त्यातील सुचनेनुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. आपल्या माहितीसाठी सदर ठिकाणी helpline देण्यात आलेली आहे. तसेच शासनाने यासंदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, विद्यापीठाचा बृहत आराखडा, संलग्नता शुल्काचा तक्ता, प्रक्रिया आदि शुल्काचे परिपत्रक व इतर सविस्तर माहिती आणि संबधीत परिपत्रके Important G.R./ Circulars लिंक वर देण्यात आलेली आहे.

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार शासन निर्णय दि. १३ सप्टेंबर, २०१७ व दि. १५ सप्टेंबर, २०१७ अन्वये विहित केलेल्या नियमानुसार एका वर्षापुर्वीच्या नोंदणीकृत शैक्षणिक संस्थांनी दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९ पर्यंत कार्यालयीन वेळेत अर्ज सादर करावेत.

२. अस्तित्वात असलेल्या सर्व नोंदणीकृत संस्था / संलग्नीत महाविद्यालयांनी ई-बृहत आराखड्यांची प्रत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. बृहत आराखड्याच्या प्रती सोबत ऑनलाईन रजिस्ट्रेशन करीता शुल्क स्वतंत्रपणे भरल्यानंतर Login ID व Password शैक्षणिक विभागाकडून प्राप्त करुन घेतल्यानंतरच पुढील कार्यवाही करता येईल.

३. सदर अर्जापैकी आपणास लागु असलेल्या अर्जाची माहिती आपण ऑनलाईन प्रणालीद्वारे भरावी व त्याची A-४ साईज पेपरवर एकाच बाजुने प्रिंट घेऊन (परिपत्रकात नमुद केलेल्या प्रतीत) त्यासोबत आवश्यक ते कागदपत्र, सहपत्र, विहित केलेले संलग्नता शुल्कासह अर्ज वेळापत्रकाप्रमाणे सादर करावेत. या परिपत्रकाद्वारे जमा करण्यात येणारे विहित संलग्नीकरण शुल्क राष्ट्रीय कृत बँकेमार्फत RTGS/NIFT द्वारे जमा केल्यानंतर येणाऱ्या पावतीची प्रत लेखा विभागात व संलग्नीकरण विभागात सादर करण्यात यावी.

४. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी नवीन महाविद्यालयाकरीता बिंदू / ठिकाणाबाबतची माहिती विद्यापीठाच्या www.bamu.ac.in या संकेतस्थळावर प्रकाशीत करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण व विकास आयोगाच्या (माहेड) मंजूरीच्या अधिन राहून पात्र अर्जांचा विचार करण्यात येईल.**

विद्यापीठ प्रांगण, औरंगाबाद. *
संदर्भ क्र. शैक्ष/संलग्न/आरएम/२०१९-२०/१२६८० *
दिनांक:- ३०-०७-२०१९ *
=R=

**स्वाक्षरित/-**
**कुलसचिव**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
औरंगाबाद.